महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. ९२८५
दिनांक :२०/०६/२०१८

## कार्यालयीन आदेश

विषय :- पुणे महानगरपालिकेच्या मान्यताप्राप्त ठेकेदारांच्या यादीमध्ये नोंदणी करणेकरिता अवलंबावयाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करणेबाबत.

संदर्भ :- १) पुणे म.न.पा.मान्यताप्राप्त ठेकेदारांच्या यादीमध्ये नोंदणी करण्याबाबतचे नियम व माहिती पुस्तिका.
२) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/६४६ दि.१६/१०/२००८ अन्वये मान्यता देण्यात आलेली सुधारित निविदा कार्यपद्धती.
३) मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका ठराव क्र.६/३१५ दि.१८/०३/२०१५.
४) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/३३ दि.२७/४/२०१६.
५) महापालिका आयुक्त कार्यालय पुणे महानगरपालिका जा.क्र.मआ/द/४७ दि.१६/१०/२०१७ चे कार्यालयीन आदेश.
६) महापालिका आयुक्त ठराव क्र.६/२७७ दि.१८/०६/२०१८.

पुणे महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीने स्थापत्य, विद्युत व विद्युत (यांत्रिकी) संवर्गातील कामे घेऊ इच्छिणाऱ्या कंत्राटदारांना पुणे महानगरपालिकेच्या दक्षता विभागाकडून विविध नोंदणी वर्गांमध्ये संबंधित खात्याच्या शिफारस / अभिप्रायानुसार ठेकेदार नोंदणी देण्यात येते. ठेकेदार नोंदणीबाबतचे नियम व माहिती पुस्तिकेच्या आधारे तसेच संदर्भ क्र. २ व ५ चे कार्यालयीन आदेशान्वये ठेकेदार नोंदणी नियमांमध्ये करणेत आलेल्या बदलांनुसार ठेकेदार नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाते. तसेच मे.शासन आदेश / कार्यालयीन आदेश / कार्यालयीन परीपत्रकाद्वारे वेळोवेळी झालेल्या सुधारणा / बदल यांनुसार सद्यस्थितीतील ठेकेदार नोंदणी प्रक्रीयेमध्ये वेळोवेळी सुधारणा / दुरुस्ती करणेत आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत कार्यान्वित असणाऱ्या ऑनलाईन ठेकेदार नोंदणी प्रक्रीयेमध्ये वेळेचा होणारा अपव्यय कमी करणेकरिता व ठेकेदार नोंदणी अधिक सक्षम व प्रभावी होणेकरिता ठेकेदार नोंदणी प्रक्रियेत खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहेत.

१. पुणे म.न.पा.मान्यताप्राप्त ठेकेदारांच्या यादीमध्ये नोंदणी करण्याबाबतचे नियम व माहिती या पुस्तिकेतील नियम ३(फ) नुसार ठेकेदार नोंदणी प्रस्ताव दक्षता विभागामध्ये ऑनलाईन आवक झाल्यानंतर सदर प्रस्ताव अर्जदाराच्या मागणीनुसार संबंधित विभागाकडे पाठविणे. संबंधित विभागाने अर्जदाराचा अर्ज, आवश्यक संपूर्ण मूळ कागदपत्रे, अर्जदाराचे अनुभवाचे दाखले (खाजगी कामांसंदर्भात आवश्यक वाटल्यास प्रत्यक्ष जागा पाहणी करणे) इ. छाननी

करून व आवश्यकतेनुसार पूर्तता करून घेऊन सदर प्रस्ताव अभिप्राय / शिफारस करून दक्षता विभागाकडे सादर करणे. सादर प्रस्तावाची व संबंधित विभागाने दिलेल्या अभिप्राय / शिफारस याची दक्षता विभागाकडील संबंधित अभियंत्यांकडून तपासणी झाल्यानंतर सदर प्रस्ताव उप आयुक्त(दक्षता) यांचे अंतिम मान्यतेसाठी सादर करणे.

२. ठेकेदारास आक्षेप कळविल्यानंतर सदर ठेकेदाराने आक्षेप कळविल्याच्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत आक्षेपांची पूर्तता न केल्यास सदर ठेकेदाराचा प्रस्ताव निकाली काढणे.

३. सोबत जोडलेल्या ठेकेदार नोंदणी कालमर्यादा कोष्टकाप्रमाणे ठेकेदार नोंदणी प्रस्ताव छाननीची मुदत विहित करणेत आली असून त्यानुसार कार्यवाही करणे.

४. उपरोक्त नमूद बाबींस अनुसरून अस्तित्वातील संगणक प्रणाली मध्ये योग्य ते फेरबदल करणे.

तरी, ठेकेदार नोंदणी संबंधित सर्व विभागांनी उपरोक्त सुधारणांनुसार कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.

कळावे.

(सौरभ राव)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :

मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष / जनरल / इस्टेट)
पुणे महानगरपालिका.

**यांजकडेस माहितीस्तव सादर...**

**प्रति :**

मा.खातेप्रमुख
(भवन रचना / पथ / पाणीपुरवठा / मलनिःसारण / पर्वती जलकेंद्र / विद्युत विभाग / मोटार वाहन विभाग)
पुणे महानगरपालिका.

**यांजकडेस पुढील कार्यवाहीकरिता....**